SHIV SHAKTI

International Journal in Multidisciplinary and Academic Research (SSIJMAR)

UGC Care list journal

Vol. 7, No. 3, August 2018 (ISSN 2278 – 5973)

# बी.एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकांमध्ये निर्माण होणाऱ्या अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास

**शिवराज ढाले** (संशोधक विद्यार्थी)

**डॉ. विजय सप्रे** (प्राचार्य, श्रमजीवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, उमरगा, जि. उस्मानाबाद )

**प्रस्तावना :**

"जर एखाद्या विद्यार्थ्याने विकसनशील जगासाठी तयार रहायचे असेल तर सक्षम शिक्षकाचे आवश्यक गुणधर्म म्हणजे जगाविषयी जागरूकता". शिक्षक एक एकीकृत व्यक्ती, मानवी संबंधांच्या कला आणि विज्ञानात कुशल असावा आणि जगातील विविध प्रकारच्या वर्तन पद्धतींविषयी जागरूक असेल ज्यामध्ये त्याला समायोजित करावे लागेल. समायोजन ही सोपी संज्ञा नसते राष्ट्राचा विकास हा त्यांच्या विद्यार्थ्यांवर अवलंबून असतो आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास त्याच्या शिक्षकावर अवलंबून असतो. घर, शाळा आणि समाजात समायोजित करण्याची क्षमता फक्त एक शिक्षक मुलांमध्ये विकसित करतो . त्यांच्या पदाची आणि भूमिकेच्या आधारे शिक्षक आजच्या समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि संवर्धन करणारे सर्वात महत्त्वाचे घटक आहेत.आयुष्याच्या सर्वात प्रभावी कालावधीत मानवी सामग्रीचा सामना करण्यासाठी, भविष्यातील नागरिकाचे व्यक्तिमत्व, चरित्र, बौद्धिक वाढ, दृष्टीकोन आणि मूल्य यावर मोठ्या प्रमाणात परिणाम करण्यास शिक्षक बांधील आहे. त्यांच्या या महत्वपूर्ण भूमिकेचा विचार करता समाजाला त्यांच्या कार्याची आव्हाने पेलण्यासाठी पुरेशी संसाधने पुरविणे महत्वाचे आहे. या संदर्भात शिक्षकांची पात्रता तयार करण्यात अधिक जबाबदाऱ्या आहेत.

**अभिवृत्ती :**अभिवृत्ती म्हणजे स्थिर झालेली मन:स्थिती. पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन त्यानुसार विशिष्ट उद्दिपकाला ठराविक प्रकारे प्रतिक्रिया देण्याची प्रवृत्ती. व्यक्तीच्या अनुभवातून अभिवृत्ती निर्माण होत असते. अभिवृत्तीमुळे तत्परता किंवा पूर्वतयारी सूचित होते. विशिष्ट प्रसंगात विशिष्ट प्रकारे वागण्याची तयारी यामुळेच निर्माण होते. अभिवृत्तीमुळे वर्तनाला विशिष्ट वळण लागते. संगीत, चित्रकला, नाट्य, नृत्य, खेळ इत्यादीसंबंधी आपले काही अनुकूल किंवा

प्रतिकूल ग्रह असतील तर त्यादृष्टीने आपण वेळोवेळी या गोष्टीकडै पाहतो. व्यक्तीच्या प्रतिक्रिया सुध्दा अभिवृत्तीवर अवलंबून असतात.

According to Kiesler (1971) "attitudes are predispositions to think, feel, perceive and behave selectively towards referents of attitude."

According to Thurstone (1931) "It is the effect for or against a psychological object."

अभिवृत्ती म्हणजे मानसिक व मज्ज्जातंतूविषयक सिध्दता होय.

- **संशोधनाची गरज :** बी.एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकांची अध्ययन-अध्यापन, अध्ययनार्थी शिक्षकी पेशा शाळा, समाज व अध्ययनार्थीच्या सर्वांगीण विकासाशी निगडीत असणाऱ्या घटकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा निर्माण झाला आहे हे पाहण्यासाठी शाळा, समाज व अध्ययनार्थीच्या दृष्टीने सदर संशोधनाची गरज आहे. बी.एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकामध्ये कोणत्या क्षमता व अभिवृत्ती निर्माण होत असाव्यात असा प्रश्न संशोधकाच्या मनामध्ये निर्माण झाल्यामुळे सदर संशोधन संशोधकाने हाती घेतले आहे.

- **संशोधनाचे महत्त्व :** शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधून विद्यार्थी शिक्षकांना दिले जाणारे सेवापूर्व शिक्षण हे भविष्यकालीन समाजाच्या निर्मितीसाठी ज्ञानाधिष्ठित समाजाची जडणघडण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थी शिक्षकांना योग्य असे सेवापूर्व प्रशिक्षण देण्यासाठी सध्याच्या बी.एड. अभ्यासक्रमाचा अभ्यास करणे विद्यार्थी शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या अभ्यासाद्वारे विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीच्या वृध्दीसाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधन समस्येचे शीर्षक :-**

**बी.एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकांमध्ये निर्माण होणाऱ्या अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास.**

- **संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. बी. एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकांमध्ये निर्माण होणाऱ्या शिक्षकी व्यवसायाविषयीच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे .
2. विद्यार्थी शिक्षकामध्ये निर्माण होणाऱ्या अभिवृत्तीचा लिंग भेदाच्या दृष्टिकोनातून तौलनिक अभ्यास करणे.
3. बी.एड. अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकामध्ये निर्माण होणाऱ्या अभिवृत्तीचा ग्रामीण व शहरी दृष्टीकोनातून तौलनिक अभ्यास करणे.

- **शून्य परिकल्पना :**

1. स्त्री विद्यार्थी शिक्षक आणि पुरूष विद्यार्थी शिक्षक यांच्या शिक्षक व्यवसायाविषयी अभिवृत्तीमध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही.

2. ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षक यांच्यामध्ये शिक्षक व्यवसायाविषयी अभिवृत्ती मध्ये  कोणताही सार्थ फरक आढळत नाही.

- **संशोधन पध्दती निवड व कारणमीमांसा :**संशोधनाच्या तीन पद्धतीपैकी 'वर्णनात्मक संशोधन' या पद्धतीतील **शालेय सर्वेक्षण** या संशोधन पध्दतीची  निवड संशोधकाने केलेली आहे.

- **नमुना निवड :** संशोधनासाठी बी.एड.च्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या बी.एड.च्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या 60 विद्यार्थ्यांची संभाव्येतवर आधारित लॉटरी नमुना निवड पध्दतीने निवड केली आहे.  शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येकी 30 स्त्री विद्यार्थी शिक्षक व पुरूष विद्यार्थी शिक्षक असे एकूण 60 विद्यार्थी शिक्षक येतील  याची काळजी घेतली गेली.

- **संशोधन साधनांची निवड :** संशोधकाने संशोधनात माहिती गोळा करण्यासाठी उदिदष्टांना अनुसरून **बी.एड. च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. एस.पी. अहलुवालिया (2002)  यांची प्रमाणित अभिवृत्ती मापन शलाका वापरण्यात आली आहे.**

- **निष्कर्ष :**

1. विद्यार्थ्यांची शिक्षक व्यवसाय अभिवृत्ती ची टक्केवारी मिळाली. उच्च अभिवृत्ती असलेले विद्यार्थी 17.80 टक्के आहेत. सरासरीपेक्षा जास्त अभिवृत्ती  असलेले विद्यार्थी 27.60 टक्के   आहेत.  सरासरी  अभिवृत्ती  असलेले विद्यार्थी  30.60 टक्के   आहेत. सरासरीपेक्षा खूपच कमी अभिवृत्ती  असलेले विद्यार्थी 14.20टक्के   आहेत. तर खूपच कमी अभियोग्यता असलेले विद्यार्थी 9.80 टक्के  आहेत.

2. प्रस्तुत उद्दिष्टाकरिता ‘CR’ चे  3.30 मिळाले आहे. ‘CR’ सारणीमूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून **स्त्री विद्यार्थी व पुरूष विद्यार्थी शिक्षक यांच्यामध्ये शिक्षक व्यवसायाविषयी अभिवृत्ती समान असते या  परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.**

3. बी.एड. महाविद्यालयातील स्त्री व पुरूष विद्यार्थी शिक्षक यांच्या अभिवृत्तीत लक्षणीय फरक आढळून येते. म्हणजेच बी.एड. महाविद्यालयातील स्त्री व पुरूष विद्यार्थी शिक्षक यांच्या अभिवृत्ती ही सारख्याच स्वरूपाची नसते. याचे कारण अभिवृत्ती या  वर्तन प्रेरक असतात. स्त्री विद्यार्थी शिक्षकांमध्ये शिक्षकी व्यवसायाविषयीची अभिवृत्ती जास्त प्रमाणात दिसून येतात. अभिवृत्तीत मन:स्थितीत चांगली असू शकते. तशीच ती वाईट किंवा चांगल्या वाईटाचे मिश्रण असू शकते. या मन:स्थितीत संमिश्र भावना  दिसून येतात.

4. अभिवृत्तीमधील 6 घटकांचा विचार केला असता स्त्री व पुरूष विद्यार्थ्यांमध्ये हे 6 ही घटक थोड्याफार प्रमाणात कमी जास्त असल्याचे दिसून आले.

5. प्रस्तुत उद्दिष्टाकरिता ‘CR’ चे मूल्य 1.30 मिळाले आहे. याचा अर्थ असा की, ‘CR’ मूल्य सारणीमूल्यापेक्षा **कमी** आहे. **ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षक यांच्यामध्ये शिक्षक व्यवसायाविषयी अभिवृत्ती समान असते या परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.**
6. बी.एड. महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षक यांच्या अभिवृत्तीत लक्षणीय फरक आढळून येत नाही. म्हणजेच बी.एड. महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षक यांच्या अभिवृत्ती ही सारख्याच स्वरूपाची आहे. त्यांच्यामध्ये लक्षणीय फरक नाही. याचे कारण अभिवृत्ती या वर्तन प्रेरक असतात.
7. ग्रामीण विद्यार्थी शिक्षकांमध्ये शिक्षकी व्यवसायाविषयीची अभिवृत्ती थोड्या प्रमाणात जास्त दिसून येतात. अभिवृत्तीत मन:स्थिती चांगली असू शकते. तशीच ती वाईट किंवा चांगल्या वाईटाचे मिश्रण असू शकते. या मन:स्थितीत संमिश्र भावना दिसून येतात. अभिवृत्तीमधील 6 घटकांचा विचार केला असता ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांमध्ये हे 6 ही घटक सारख्याच प्रमाणात असल्याचे दिसून आले.

- **शिफारशी :**

1. सर्वच विद्यार्थ्यांचा शिक्षकी व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोन खूपच सकारात्मक कसा राहील या दृष्टीने प्राध्यापकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्राध्यापकांनी त्यासाठी अनुभवी शिक्षक, प्राध्यापक यांची व्याख्याने, चर्चा यासारख्या उपक्रमांची योजना करावी.
2. बी.एड.च्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक व्यवसायाबाबतची अभिवृत्ती विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्राचा व पध्दतीचा वापर करावा.
3. बी.एड. च्या विद्यार्थ्यांनी शिक्षणक्षेत्रात नवीन विचारप्रवाह व संकल्पना विकसित करण्यासाठी शैक्षणिक मासिके, इंटरनेटवरील साहित्य, शैक्षणिक लेख यासारख्या संसाधनांचा वापर केला पाहिजे.
4. बी.एड. च्या विद्यार्थ्यांनी पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी एकच एक पध्दती वापरू नये. त्यामध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करावा.
5. बी.एड. विद्यार्थ्यांनी पाठ घेताना स्वत:च्या नाविन्यपूर्ण कल्पना, विचार, तंत्र यांचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर करावा.

## संदर्भग्रंथसूची


1. आगलावे ,प्रदीप. (2000). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन.
2. कक्कड, गुरुप्रसाद आणि गायकवाड, शशी (1995) शिक्षण व अध्यापक शिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे
3. कदम चा.प. (2005), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नुतन प्रकाशन
4. कदम चारूदत्त, बोंदार्डे कैलास, बोंदार्डे अश्विन (2004), शास्त्र अध्यापन पद्धती व आशययुक्त अध्यापन, पुणे : नुतन प्रकाशन
5. कर्डिले वंसतराव, महाले संजीवनी (2008), संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, नाशिक : य. च. म. मुक्त विद्यापीठ